माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/६४/२०१९
दि.१९/०६/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्रीम.तिवारी बीना अनिल,
बीना निवास, काजुपाडा गाव,
घोडबंदर, ठाणे ४०११०७.
............अपिलार्थी

जनमाहिती अधिकारी तथा,
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४.
...............प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्रीम.तिवारी बीना अनिल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांचेकडे दि.२३/०५/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला

१) मालमत्ता क्र.एम०१००४३४६५००० कोणाच्या नावाने देण्यात आला आहे?

१ए) ह्या मालमत्ता क्रमांकाचा सर्वे नं., क्षेत्रफळ, जारी करण्याची तारीख आणि एकुण भरलेली रक्कम ह्याची पुर्ण माहिती द्या.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती मिळाली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.२३/०५/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/९४/२०१९ दि.१३/०६/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२३/०४/२०१९ रोजीच्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

२०/६/१९

Scanned by CamScanner

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४, यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती दिलेली असल्याने तसेच अपिलार्थी अर्जदाराने माहिती मिळाल्याचे मान्य केल्याने सदर अपिल निकाली काढण्यात आले आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

O/C

१) श्रीम.तिवारी बीना अनिल,
बीना निवास, काजुपाडा गाव,
घोडबंदर, ठाणे ४०११०७.

Beena 21/6/2019

२) [redacted].जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.४

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner